

महाराष्ट्राचे
संजीवक
— ७ —


म. ग्रं. सं. ठाणें
विषय बालवाङ्मय
वा. नं. ५५५


# महान् मुत्सद्दी
# ना. गोखले

— दा. न. शिखरे


केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण—त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेविलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे आपला संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

द्वा. न. शिखरे

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १५ मे, १९५१

महाराष्ट्राचे संजीवक

....७....

# महान मुत्सद्दी

# नामदार गोखले

लेखक

दा. न. शिखरे, एम. ए.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

********

मूल्य

IRBK-0103832
IRBK-0103832

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| दोन गोपाळराव | ... ... | ३ |
| शिक्षण व शील | ... ... | ६ |
| त्यागाचें तेज | ... ... | १२ |
| गुरूची भेट | ... ... | १८ |
| विरोधाचीं वादळें | ... ... | २६ |
| राष्ट्र-सभेचे अध्यक्ष | ... ... | ३४ |
| भारत-सेवकांची खाण | ... | ४० |


सर्वाधिकार प्रकाशकाधीन


पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

आं.नं.५४



# दोन गोपाळराव

महाराष्ट्राचें नशीब थोर, म्हणून त्याला दोन थोर गोपाळरावांचा लाभ एकाच वेळीं झाला. समाजाचा विकास चोहों बाजूंनीं त्वरित व्हावा म्हणूनच कीं काय, महाराष्ट्राच्या वांट्यास दोन अलौकिक गोपाळराव आले. हे दोन गोपाळराव म्हणजे एक आगरकर व दुसरे गोखले — जणुं गुरु-शुक्राची युतिच. दोघेही दारिद्र्याच्या चिखलांत आकंठ बुडालेले, दोघांनींही आपल्या मनगटाच्या जोरावर आपलें शिक्षण पुरें केलेलें, दोघांनींही



गोपाळराव आगरकर


रा. सा. मंडलीक

विद्यार्जनानंतर स्वार्थत्याग करून ज्ञान-दानाच्या कार्यास वाहून घेतलेले, फार काय, एकाच 'सुधारक' पत्राचे एकाच वेळीं दोघेही संपादक असलेले आणि दोघेही मोठे कष्टाळू, सत्यप्रिय, नीतिमान् व अप्रियता सोसूनही देशभक्ति आचरणारे.

महाराष्ट्रांत हिऱ्याच्या खाणी नसतील, पण अशा नररत्नांच्या आहेत. प्रिं. आगरकरांनीं लहानपणीं दुसऱ्याच्या घरीं जेवणासाठीं वार लावून आपलें शिक्षण पुरें केलें, तर रा. सा. मंडलिकांनीं विद्यार्थीदशेंत हातांत प्रत्यक्ष चौपदरी घेऊन मधुकरी मागितली आणि नामदार गोखले ह्यांनीं तर कांहीं काळ म्युनिसिपालिटीच्या दिव्याखालीं बसून अभ्यास केला – काटकसरीसाठीं केव्हां केव्हां उपासही केले.

न्या. रानडे म्हणजे कैक गुणांचे सागर. त्या गुणांचा वारसा त्यांनीं गोखल्यांना दिला. एका दिव्यापासून दुसरा दिवा पेटावा, त्याप्रमाणें न्या. रानडे ह्यांच्यामागून ना. गोखले ह्यांच्या गुणांचा प्रकाश पडला. व्यापक देशहित, सखोल अभ्यास आणि संयमी लेखन-भाषण हे तीन गुण ह्या गुरुशिष्यांमध्यें उत्कटत्वानें दिसून येतात. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध म्हणजे महाराष्ट्राच्या


न्यायमूर्ति रानडे

महोदयाचा पर्वकालच. त्या काळांत महाराष्ट्राच्या कुशींतून न्या. रानडे, मालाकार चिपळूणकर, लोकमान्य टिळक, प्रिं. आगरकर, ना. गोखले असे थोर थोर पुरुष जन्मास आले !



मालाकार चिपळूणकर

कोल्हापूरजवळचें कागल गांव. तेथें कृष्णराव गोखले हे कारकून होते. त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई कोंकणांतील कोतळूक गांवीं, माहेरीं, गेल्या होत्या. तेथें त्यांना ता. ९ मे १८६६ रोजीं बुधवारीं मुलगा झाला. त्याचें नांव गोपाळ ठेवलें. टिळक-आगरकरांपेक्षां गोखले हे दहा वर्षांनीं लहान. कोंकणच्या सुंदर निसर्गांत गोपाळरावांची वृत्ति रमत होती. बुद्धि वाढत होती. शरीरसौंदर्याचें देणेंही त्यांना विधात्यानें मुबलक दिलें होतें. त्यांची मुद्रा वाटोळी, अंगकांति गोरीपान व आवाज अत्यंत मधुर. गोकुळांतील गोपाळच आपल्या घरीं अवतरला असें गोपाळरावांच्या मातेस वाटल्यास नवल काय ? गोपाळ-गोविंद हे दोघे बंधु. तीच त्यांच्या आईबापांची दौलत.



लोकमान्य टिळक



# शिक्षण व शील

लहान मुलें एक मजेचा खेळ खेळतात. पोत्यांत आपले दोन्ही पाय घालावयाचे आणि तें पोतें दोन्ही हातांनीं घट्ट धरून उड्या मारीत जावयाचें, असा हा खेळ आहे. अर्थात् ह्यांत चालणाऱ्याचा वेग फार कमी असतो. पण अशक्य गोष्ट शक्य केल्याची करामत त्यांत असते आणि त्यांतच आनंद असतो. तीच करामत गोपाळरावांनीं विद्येच्या मुलुखांत करून दाखविली. अतिशय हाल सोसून व श्रम करून ते शिक्षणाच्या एकेक पायऱ्या चढूं लागले. गरिबी त्यांचे पाय मागें ओढीत होती, तर महत्त्वाकांक्षा त्यांना पुढें खेचीत होती. अशा ओढाताणींतच त्यांनीं आपल्या शिक्षणाचा पल्ला गांठला.

*******************

शाळेंतील परीक्षेशिवाय शीलाच्या परीक्षेंतही ते पहिल्यापासूनच वरचा क्रमांक मिळवीत होते. एके दिवशीं गुरुजींनीं घरून गणित करून आणावयास सांगितलें. साऱ्या विद्यार्थ्यांचीं उत्तरें चुकलीं. बरोबर काय तें एकट्या गोपाळरावांचें. सारीं मुलें त्यांच्याकडे टकमकां पाहूं लागलीं. गुरुजींना तर त्याचें भारी कौतुक वाटलें. त्यांनीं त्यांस तोंड भरून शाबासकी दिली. ती ऐकून गोपाळरावांचा चेहेरा फुलला काय ? डोळे आनंदानें चमकूं लागले काय ? छाती अभिमानानें फुगली काय ? छे:, अगदीं उलट स्थिति झाली. त्यांचा चेहेरा कावराबावरा झाला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. ते ओक्साबोक्शीं रडूं लागले.

"कां रे गोपाळ, असा रडतोस कां ?" गुरुजींनीं आश्चर्यानें विचारिलें.

गोपाळरावांनीं अश्रु पुसत पुसत व हुंदके देत देत सांगितलें, "माझं गणित बरोबर आहे ना? पण तें मीं सोडवलेलं नाहीं. मला पहिला नंबर नको." सत्याचा हा बाणा गोपाळरावांनीं आमरण टिकविला.

खेळांतही ते सत्य सोडीत नसत. एकदा आट्यापाट्यांचा खेळ चालला होता. खेळ रंगांत आला होता. गोविंद व गोपाळ हे भाऊ-भाऊ विरुद्ध बाजूनें होते. गोविंद गोपाळास हळूच म्हणतो, "गोपाळ, मला धरूं नको हं. मला सोडून दे." गोपाळनें ठासून उत्तर दिलें, "छे: भाऊ, असं कसं म्हणतोस ? मी पाहिजे तर खेळ सोडून जातों, पण खोटं वागून मी माझ्या बाजूचं नुकसान कसं करूं ?" नेतेपणाचे गुण म्हणतात ते हेच. आपल्या पक्षाविषयीं

...७...

निष्ठा बाळगणें आणि ती कोणत्याही मोहाला वश होऊन न सोडणें, हे गुण समाजांत वाढीला लागणें अवश्य आहे.


दहाव्या वर्षापर्यंत गोपाळरावांचें मराठी शिक्षण कागल येथेंच झालें. पुढें इंग्रजी शिकण्यासाठीं दोन्ही भावांना कोल्हापुरास पाठविण्यांत आलें. गरिबीच्या अंधारांतून दोघेही भाऊ एकमेकांना धीर देत चालले होते. त्यांतच त्यांच्यावर एक संकट आलें. तें म्हणजे त्यांच्या वडिलांचा मृत्यु. १८७९ सालीं कृष्णराव वारले. त्या वेळीं ते फौजदाराच्या हुद्दयावर होते. वडिलांचें कृपाछत्र गेल्यानंतर दोन्ही भावांपुढें मोठाच प्रश्न उभा राहिला. तो सोडविण्यासाठीं वडील भावानें फार मोठा स्वार्थत्याग केला. तो म्हणजे शिक्षण सोडून नोकरी पत्करण्याचा. ह्या वेळेस गोविंदाचें वय फक्त अठरा वर्षांचें होतें. त्यास अजून शिकण्याची उमेद व हौस होती. परंतु आपण नोकरी करून पैसे मिळवावेत आणि त्यांतून गोपाळचें शिक्षण पार पाडावें असा उदार विचार गोविंदानें केला.

आगबोटींतून वादळाच्या प्रसंगीं स्वतः समुद्रांत उडी टाकून आपल्या भावाचें रक्षण करणाऱ्या एका बहाद्दराची गोष्ट प्रसिद्ध आहे. त्याचे पोवाडे गायिले जातात. तितकाच गौरव त्यागी गोविंदराव गोखल्यांचा करणें जरूर आहे. आपल्या भावाचा शैक्षणिक प्रवास शेवटपर्यंत सुखानें व्हावा म्हणून त्यांनीं विद्येच्या नौकेंतून नौकरीच्या समुद्रांत उडी टाकली. कागल येथेंच कारकुनीची नोकरी त्यांना मिळाली. कारकुनाचा पगार तेव्हां कितीसा असणार ? पण त्यांतूनही दरमहा दहा रुपये ते गोपाळरावांना पाठवीत असत — स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊनही बिनचूक पाठवीत असत.

असा उदार भाऊ मिळाला हें गोपाळरावांचें भाग्य – आणि तशीच प्रेमळ वहिनी लाभली हें त्यांचें अहोभाग्य! कधीं कधीं संसाराला पगार पुरेनासा झाला म्हणजे गोविंदराव वैतागानें गोपाळरावांस म्हणत, “आतां पुरे कर तुझं शिकणं. कुठेंतरी नोकरी धर नि संसारास मदत कर.” पण चटकन् त्यांची पत्नी म्हणे, “शिका हो भाऊजी तुम्ही. माझं किडुकमिडुक मोडून देईन मी. तुम्ही आपली शिकण्याची हौस पुरी करून घ्या.”

आणि खरोखरच त्या माउलीनें आपल्या अंगावर असलेले लहानसहान दागिनेही गोपाळरावांच्या शिक्षणासाठीं काढून दिले. ह्या अबोल व असीम त्यागाची परतफेड गोपाळरावांनीं पुढें आपल्या आयुष्यांत केली.

भावानें कष्टानें मिळविलेला व काटकसरीनें जमविलेला पैसा गोपाळराव फार दक्षतेनें खर्च करीत. दरमहा ते आपला हिशेब



...९...

भावाकडे पाठवीत. ते खानावळींत जेवत असत. एकदा त्यांनीं सहज दहीं मागितलें. तेव्हां बल्लवाचार्य गुरगुरले, "महिना आठ आणे जास्त द्यावे लागतील. उगीच नाहीं दहीं फुकट मिळत."

"मला रोज दहीं वाढीत जा. मी देईन आठ आणे." गोपाळरावांनीं लगेच बजावलें.

'देईन आठ आणे' असें म्हणणें सोपें. पण ते आठ आणे आणावयाचे कोठून, हा प्रश्न गोपाळरावांना पडला.

तो सोडविण्यासाठीं त्यांना एक युक्ति सुचली.

दर शनिवारीं ते उपवास करूं लागले.

अशा रीतीनें त्यांनीं आठ आण्यांची बचत केली !

आणखी एकदा आठ आणे ! नको नको म्हणत असतां त्यांना एका स्नेह्यानें नाटकास नेलें. तिकीट त्यानेंच काढलें. नाटक पाहून झालें. नंतर कांहीं दिवसांनीं तो स्नेही गोपाळरावांकडे तिकिटाचे आठ आणे मागूं लागला. गोपाळरावांनीं ते दिले. पण आपल्या जमाखर्चांतील ही खिंड कशी भरून काढायची, ह्याचा विचार त्यांना पडला. पुन्हा युक्ति सुचली. गरीब माणसाला युक्त्याच युक्त्या सुचतात ! त्याला कोणताही त्याग अशक्य वाटत नाहीं. जेवण नाहीं, चालेल; कपडा नाहीं, चालेल; वाचनासाठीं दिवा नाहीं, तरीही चालेल; गोपाळरावांनीं एक महिनाभर म्युनिसिपालिटीच्या दिव्याखालीं बसून अभ्यास केला आणि आपल्या दिव्याच्या खर्चांतील आठ आणे वांचविले.

अशा रीतीनें गरिबीशीं तोंड देत देत, गोपाळरावांनीं आपलें दुय्यम शिक्षण पुरें केलें. वयाच्या पंधराव्या वर्षीं ते मॅट्रिकची

परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची स्मरणशक्ति अलौकिक होती. बुद्धि बेताचीच, पण पाठान्तरावर भर फार. अभ्यासास नेमलेलें सबंध इंग्रजी काव्य त्यांनीं तोंडपाठ केलेलें होतें. त्यांनीं तें काव्य घडघडा म्हटलें म्हणजे त्यांचे वर्गबंधु चकित होत. पण त्याचा गौरव न न करतां 'पाठ्या, घोव्या' असें म्हणून ते त्याला चिडवीत. पण गोपाळरावांनीं घोकंपट्टीवरचा भर कधीं कमी केला नाहीं. ते क्रिकेट चांगलें खेळत. पत्त्यांचीही आवड त्यांना होती. बुद्धिबळें, सोंगट्या, गंजिफा ह्यांमध्येंही त्यांचें मन रंगे.



# त्यागाचें तेज

कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत गोपाळराव दाखल झाले. त्या वेळीं कॉलेजमध्यें पहिल्या वर्षाचा फक्त एकच वर्ग होता. त्यांना आपलें कॉलेजचें शिक्षण पुरें करण्यासाठीं त्रिस्थळी यात्रा करावी लागली. १८८२ सालीं पहिली परीक्षा ते उत्तीर्ण झाले. पुढील अभ्यासासाठीं त्यांना पुण्यास डेक्कन कॉलेजमध्यें यावें लागलें. तेथें त्यांनीं पहिली सहामाही काढली. डेक्कन कॉलेज हें लक्ष्मीपुत्रांचें माहेरघर ! आणि लक्ष्मीनें तर गोपाळरावांकडे पाठ फिरविलेली. दुसरा मार्ग नाहीं म्हणूनच ते तेथें मोठ्या कष्टानें राहिले. परंतु दुसऱ्या वर्षाचा वर्गही कोल्हापुरास निघाल्याची वार्ता कानीं येतांच ते लगेच राजाराम कॉलेजमध्यें गेले. तेथें त्यांनीं दुसरी सहामाही काढली.

## हायकोर्ट दणाणून सोडावें

******************

परीक्षेंत यश मिळविणें हें तर प्रत्येक विद्यार्थ्याचें ध्येय असतेंच. तसें तें गोपाळरावांच्या डोळ्यांपुढेंही होतें. पण त्यांच्या अंत:करणांत एक विशेष महत्त्वाकांक्षा सारखी तेवत होती. ती म्हणजे आपण फर्डें इंग्रजी लिहावें व बोलावें, ही. त्या वेळीं मुंबईचे वाच्छा-मेहता, पुण्याचे न्या. रानडे, वगैरे थोर थोर लोकांची उत्कृष्ट इंग्रजी बोलण्याबद्दल ख्याति होती. साहेबांनींही मान डोलवावी असें शुद्ध, पल्लेदार, अलंकारिक व परिणामकारक इंग्रजी भाषण ह्या थोर पुढाऱ्यांप्रमाणें आपणांसही करतां यावें, मुंबईच्या हायकोर्टाची इमारत आपल्या इंग्रजी वक्तृत्वानें दणाणून सोडावी, अशीही पुसट इच्छा गोपाळरावांच्या मनांत एखाद्या ज्योतीप्रमाणें सतत तेवत होती. ती इच्छा पूर्ण व्हावी म्हणून ते भगीरथ प्रयत्न करीत. कष्टांचा कंटाळा कसा तो त्यांना ठाऊक नव्हता. श्रम – श्रम – आणि अखंड श्रम हेंच त्यांचें भांडवल आणि हीच त्यांची तपश्चर्या.

कॉलेजांतील पुस्तकांचा अभ्यास करावयाचा म्हणजे त्यावरून केवळ नजरफेक करावयाची व त्यांची फक्त तोंडओळख करून घ्यावयाची, असें गोपाळराव कधींच मानीत नसत. जें पुस्तक अभ्यासावयाचें त्याचा कोनाकोपरासुद्धा ते निरखून पाहात. इंग्रजी भाषाशैलीचे सुवर्णकण जेथें जेथें दिसतील, तेथून वेचून काढून आपल्या वहींत, नुसत्या वहींतच नव्हे तर आपल्या कंठांत, गोपाळराव ते एखाद्या कंजुष माणसाप्रमाणें सांठवून जतन करून ठेवीत. सुप्रसिद्ध वक्ता एडमंड बर्क ह्याचें, 'फ्रेंच राज्यक्रांतीवरील विचार' हें पुस्तक त्यांना नेमलेलें होतें. त्यांतील उत्कृष्ट उतारे गोपाळरावांनीं पाठ केले. उदात्त विचार आणि प्रौढ भाषाशैली

*******************



सुप्रसिद्ध वक्ता एडमंड बर्क

ह्यांचा सुंदर संगम बर्कनें आपल्या त्या पुस्तकांत साधला आहे. ते गुण गोपाळरावांनीं शोषून घेऊन आपल्या अंगीं मुरविले. मोहोळाची पेशीन् पेशी पिळून काढून मध सांठवावा, तसा त्यांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास करून केला.

पहिलें वर्ष कोल्हापुरास निघालें, दुसरें वर्ष पुणें-कोल्हापूर ह्यांमध्यें वांटलें गेलें, तिसऱ्या वर्षासाठीं तिसऱ्या शहराकडे गोपाळरावांना धाव घ्यावी लागली. मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यांनीं नांव दाखल केलें. १८८४ सालीं, जानेवारीमध्यें ते मुंबईस गेले. गणित हा ऐच्छिक विषय घेऊन ते अभ्यास करूं लागले. ते बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्या वेळीं त्यांचें वय फक्त अठरा वर्षांचें होतें.

बी. ए. चा दरवाजा उघडला गेला आणि त्याबरोबर गोपाळरावांच्या डोळ्यांपुढें अनेक लहानमोठे रस्ते दिसूं लागले. इंग्लंडला जाऊन आय्. सी. एस्. होण्याचा राजमार्ग आक्रमण करण्याची इच्छा, बुद्धि व हिम्मत त्यांच्या ठायीं होती. पण गरिबीचा पायबंद बसलेला. वकील व्हावें अशीही ऊर्मि त्यांच्या चित्तांत खेळूं लागली. हातांत माती धरीन तर सोनें करीन, अशी ईर्ष्या त्यांच्या हृदयांत खेळूं लागली. पण जेथें तेथें दारिद्र्य त्यांना आड आलें. एंजीनिअर होण्याचें त्यांच्या मनांत आलें. फार काय, एंजीनिअरिंग कॉलेजमध्यें त्यांनीं नांव घातलें, ते तेथें जाऊंही लागले. परंतु पुण्यास ह्याच

सुमारास डेक्कन कॉलेजमध्यें एक वकिलीचा वर्ग निघाला, तेव्हां त्यांतही त्यांनीं नांव घातलें.

ज्ञान संपादण्याचें हें काम चालू असतांच धन मिळविण्याची जबाबदारीही त्यांच्यावर होती. बी. ए. ची किल्ली हातांत असल्यामुळें त्यांना सरकारी नोकरीचे मोठे दरवाजेही उघडतां आले असते. लठ्ठ पगाराच्या व खूप मानाच्या सरकारी नोकऱ्या तेव्हां पदवीधरांपुढें हात जोडून उभ्या असत. पण ह्याच वेळीं गोपाळरावांच्या डोळ्यांपुढें तीन तेजस्वी तारे चमकत होते. हे तीन तरुण म्हणजे चिपळूणकर-टिळक-आगरकर. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या 'निबंधमालेच्या' द्वारें देशाभिमानाचे व स्वार्थत्यागाचे किरण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत फेकले होते आणि त्यामुळें तरुणांचीं अंतःकरणें उजळून निघालीं होतीं. 'शीक इंग्रजी कीं हो सरकारी नोकर आणि मिळव लठ्ठ पगार' ही अव्वल इंग्रजींतील स्वार्थी लाट शास्त्रीबुवांनीं आपल्या प्रचंड सामर्थ्यानें परतवून लावली होती आणि 'शीक, शिकव आणि देशाचा उद्धार कर,' अशी त्यागी शिकवण महाराष्ट्रीय वातावरणांत भरून टाकली होती. आपल्या राष्ट्राचा उद्धार करावा म्हणून त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल काढलें. त्याच हेतूनें, बी. ए., एल्एल्. बी. झालेले टिळकही, सरकारी नोकरीकडे पाठ फिरवून, न्यू इंग्लिश स्कूलमध्यें तीस रुपये पगारावर शिक्षक म्हणून आले. त्यांचें उदाहरण पाहून गोपाळरावांनींही ठरविलें, आपणही ह्याच राष्ट्रीय संस्थेंत जावयाचें.

पांच-सातशें रुपये पगाराच्या सरकारी नोकरीला लाथ मारून अवघ्या पस्तीस रुपयांची शिक्षकीच गोपाळरावांनीं पसंत केली.

******************

निरनिराळ्या लावण्यसंपन्न राजकन्या हातांत वर-माला घेऊन उभ्या असतांना त्यांना झिडकारून गरीब पण सुशील मुलीशींच एखाद्या तरुणानें विवाह करावा, तसें गोपाळरावांचें हें वर्तन त्यांच्या जुन्या आप्तेष्टांस चमत्कारिक वाटलें. पण स्वार्थत्याग व देशभक्ति ह्यांचें जें तेज त्यांच्यापुढें नाचत होतें तिकडेच ते ओढले गेले.

त्यांना शाळेमध्यें पस्तीस रुपये पगार मिळे. त्यांनीं एका मित्राच्या साहाय्यानें पब्लिक सर्व्हिस परीक्षेचा वर्ग काढला, त्यांतूनही दरमहा तितकीच प्राप्ती होई. त्यांतील स्वतःला अगदीं जरूरीच्या खर्चापुरती रक्कम ठेवून घेऊन, बाकी सर्व पैसे गोपाळराव आपल्या बंधूकडे पाठवीत. १८८५ सालीं गोपाळराव वकिलीच्या परीक्षेंत यशस्वी झाले. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें ते इंग्रजी शिकवीत. इंग्रजी पुस्तकांतील उतारे पाठ करण्याचा त्यांचा क्रम चालूच होता. त्याशिवाय 'टाईम्स' सारख्या इंग्रजी पत्राचे अग्रलेखही ते मुखोद्गत करूं लागले, एवढेंच नव्हे तर चतुःश्रृंगीच्या माळावर जाऊन, ते अग्रलेख ते मोठमोठ्यानें म्हणत असत. सिसरो-डेमॉस्थेनिस ह्यांसारख्या इतिहासप्रसिद्ध युरोपियन वक्त्यांचा आदर्श त्यांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवला होता.



इतिहासप्रसिद्ध सिसरो

इंग्रजी वक्तृत्वाचा अलौकिक गुण आपण संपादन करावा आणि त्या गुणाच्या बळावर आपण आपल्या मातृभूमीची सेवा करावी, हा विचार गोपाळरावांच्या चित्तांत जोरानें वाहात होता. त्यासाठीं त्यांनीं ऐन तारुण्यांत

फार मोठा त्याग केला व मोहावर मात केली. गुलाबाच्या पायघड्या घातलेल्या सरकारी नोकरीचा राजमार्ग सोडून गोपाळरावांनीं लोकसेवेचा कांटेरी मार्ग आपखुषीनें स्वीकारला. ह्याचें महत्त्व वर्णन करतांना पुढें एकदा लो. टिळक म्हणाले, “ इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर राहिलें आहे आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे ; अशा वेळीं आणि विशेषेंकरून ह्या दिशेनें गेलें असतां आपणांस यश मिळण्याचा इतरांपेक्षां कांकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांही, ह्या सर्व मनोहर देखाव्यांवरून दृष्टि मागें ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें, किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें, ह्याला एक प्रकारचा बळकट मनोनिग्रह लागत असतो. आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाखविला, दाखविलाच नव्हे तर आमरण कायम ठेवला, तोच पुरुष धन्य होय. ”

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. ........... नों. दि ...........
...१७...
वि. ........... क्र. ...........

मच्छकिनी



# गुरूची भेट

पुणें येथील शनिवार पेठ. त्या पेठेंतील तांबे ह्यांचा वाडा. त्यानें किती थोरामोठ्यांना आधार दिला! कापडाच्या एकाच पांढऱ्या पडद्यावर बोलपटांतील निरनिराळीं चित्रें येतात नि जातात, तसेच महाराष्ट्रांतील निरनिराळे पुढारी ह्या वाड्याच्या आश्रयास आले. एकाच वेळीं, लो. टिळक, प्रिं. आगरकर व ना. गोखले हे तीन मोहरे ह्या वाड्यांत राहात होते. कर्तृत्वशक्ति, इच्छाशक्ति व भावनाशक्ति ह्यांचा त्रिवेणी-संगम ह्या वाड्यानें पाहिला. अर्थात् त्या वेळीं, टिळक लोकमान्य नव्हते, आगरकर प्रिन्सिपल नव्हते आणि गोखले नामदार नव्हते. तिघेही होते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक.

आ.वा.

## गोखल्यांची स्त्री-भूमिका

* * * * * * * * * * * * * * * * * *

टिळकांचें उदाहरण पाहून गोखले शाळेंत आले हें खरें, पण तेथें गेल्यावर स्वभाव व विचार ह्या दोन्ही दृष्टींनीं त्यांचें मन मिळालें आगरकरांशींच. दोघेही गोपाळराव एकविचारानें काम करूं लागले. मात्र गोखल्यांना टिळक व आगरकर ह्या दोघांविषयींही पूर्वीपासून आदरच वाटत होता. सरकारविरुद्ध निर्भयपणें गर्जना करणारे 'केसरी-मराठ्या'चे हे दोन तेजस्वी संपादक त्यांना फार थोर वाटत. कोल्हापूरच्या छत्रपतींचा कैवार घेतला म्हणून ह्या दोघा संपादकांना डोंगरीच्या तुरुंगांत खितपावें लागलें, ह्याबद्दल त्यांना हळहळ वाटली. तुरुंगांतून बाहेर आलेले हे दोघे संपादक ग्रहणांतून सुटलेल्या सूर्य-चंद्रांप्रमाणें अधिकच तेजस्वीपणानें चमकूं लागले. लोक त्यांना अधिकच मानूं लागले. गोखल्यांच्या हृदयांतही त्यांनीं अधिकच उंच स्थान पटकाविलें. 'केसरी'च्या मदतीसाठीं लोकांनीं एक निधि उभारला व त्याकरितां पुण्यास एक नाट्यप्रयोग झाला. त्यांत गोखल्यांनीं स्त्रीभूमिका केली. त्या वेळीं ते कॉलेजांत शिकत होते.

हीच आदराची भावना तांब्यांच्या वाड्यांत आल्यावरही गोखल्यांच्या मनांत होती. 'केसरी'मध्यें वर्तमानसार देण्याचें साधें कामही ते करीत. पुढें 'मराठ्यांत' इंग्रजी लेखही ते लिहूं लागले. युरोपांतील युद्धाविषयीं त्यांनीं एक लेखमालाच 'मराठ्यांत' लिहिली. शाळेंत शिकविण्यासाठींही ते फार परिश्रम करीत. पुढें फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्राध्यापक म्हणून ते शिकवूं लागले, तरी त्यांचा कष्टाळूपणा कणभरही कमी झाला नाहीं. एखाद्या लग्न-समारंभांत पानसुपारीच्या वेळीं गुलाबदाणींतून पाहुण्यांच्या अंगावर

तुषार पडावेत न पडावेत, त्याप्रमाणें कॉलेजांतील बहुतेक शिक्षण वरवर फेकलेलें असतें. गोपाळरावांजवळ तर आंग्ल-वक्तृत्वाचा फुलोरा फुललेला होता. त्यांतून दंवबिंदूंप्रमाणें ज्ञानाचें सिंचन त्यांनीं केलें असतें तरी विद्यार्थी खूष झाले असते. पण गोपाळराव हे स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला प्रमाण मानणारे व आपल्या ध्येयाशीं इमान राखणारे होते. एकदा त्यांना प्रीव्हिअसच्या विद्यार्थ्यांना नेल्सनचें चरित्र शिकवावयाचें होतें, तेव्हां जहाजांच्या अंगोपांगांची माहिती मिळविण्यासाठीं गोखले मुंबईस मुद्दाम गेले आणि तेथील जहाजांची बारीकसारीक तपशीलवार माहिती घेऊन मग ते शिकवावयास लागले.

कौटुंबिक जीवनांत मात्र गोपाळरावांना सुख असें फारसें लाभलेंच नाहीं. बालपण तर गरिबीशीं झगडण्यांतच गेलें. वडील १८७९ सालीं, म्हणजे गोपाळरावांच्या तेराव्या वर्षीं, वारले. पुढील वर्षीं त्यांचा विवाह झाला. परंतु बायको पंडुरोगी निघाली. त्यांचा दुसरा विवाह १८८७ सालीं झाला. दुसरी पत्नी व आई ह्यांना घेऊन ते तांब्यांच्या वाड्यांत राहात होते. १८९२ सालीं गोखले आईविरहित झाले. आईविषयीं गोपाळरावांना गाढ भक्ति. ज्या भाटवडेकरांच्या वाड्यांत आई दिवंगत झाली त्या वाड्यांत पुढें गोपाळराव जेव्हां जेव्हां जात, तेव्हां तेव्हां आपल्या आईच्या मृत्यूच्या खोलींत जाऊन साष्टांग नमस्कार घालीत! वडिलांबद्दलही असाच आदर. त्यांचें धोतर गोपाळरावांनीं जपून ठेवलें होतें. भक्ति हा त्यांच्या श्रद्धाशील मनाचा स्वभावच होता. पुढें त्यांचें गुरुपद पावलेले न्या. रानडे ह्यांची पगडीही त्यांनीं भक्तिभावानें पुष्कळ वर्षें जपून ठेवली होती.



रामकृष्ण परमहंस

न्या. रानडे म्हणजे तरुण देशभक्तांचें स्फूर्तिस्थान. पण रानडे कोणते, हें गोखल्यांना १८८५ सालापर्यंत ठाऊक नव्हतें. त्या वर्षीं पुण्यांत हिराबागेमध्यें एक सभा भरली होती. तेथें गोखले स्वयंसेवक म्हणून काम करीत होते. न्या. रानडे सभेस आले, तेव्हां गोखल्यांनीं त्यांना न ओळखून तिकीट विचारलें. न्यायमूर्तींजवळ तिकीट नव्हतें. तेव्हां गोखल्यांनीं त्यांना आंत जाण्यास मनाई केली. मनांतल्या मनांत हसत व त्यांच्या शिस्तशील स्वभावाचें कौतुक करीत रानडे शांतपणें उभे राहिले.

इतक्यांत त्यांची वाट पाहात असलेले सभेचे चालक तेथें धावत आले व त्यांना घेऊन गेले. आ करून गोपाळराव त्यांच्याकडे पाहातच राहिले. पहिली भेट अशी विरोधाचीच झाली. रामकृष्ण परमहंस ह्यांना नरेन्द्र भेटला तोही कांहींशा अशा विरोधी भूमिकेवरूनच. कॉलेजांतील शिक्षणानें नास्तिकतेकडे झुकलेला नरेन्द्र रामकृष्णांना पहिल्या भेटींत विरोधच करूं लागला. पण 'ये, ये, बाळा, इतका उशीर कां केलास येण्याला ?' असें जेव्हां रामकृष्ण परमहंस, मातेच्या प्रेमानें ओथंबलेल्या स्वरानें बोलले आणि त्यांनीं नरेंद्राच्या मस्तकावर



नरेंद्र [ विवेकानंद ]

************************

आपला वरदहस्त ठेवला, तेव्हां त्यांतून विवेकानंद निर्माण झाले आणि विवेकानंदांच्या अंतःकरणांतून भक्तीचे पाट वाहूं लागले. रामकृष्णांनीं चिंतनाचें कार्य केलें, तर विवेकानंदांनीं त्या कार्याचा जगभर दुंदुभि वाजविला. आध्यात्मिक क्षेत्रांतील गुरु-शिष्यांची ही जशी जोडी, तशी राजकीय क्षेत्रांत रानडे-गोखल्यांची.

न्या. रानडे ह्यांच्या थोर गुणांचें वर्णन टिळक-आगरकरांच्या तोंडून गोखल्यांच्या कानीं वारंवार पडे. तें ऐकून 'पाहावा तरी हा महापुरुष कसा आहे तो' असा विचार गोखल्यांच्या मनांत बळावला. त्यांनीं तो हळूच आगरकरांजवळ सांगितला. आगरकरांनीं बोलतां बोलतां गोखल्यांचे गुण रानड्यांच्या कानीं घातले. रानडे तर 'तीक्ष्ण बुद्धीचीं मुलें' हेरत होते, टिपत होते, जवळ करीत होते. प्रफुल्ल कमलाकडे भुंग्यानें धाव घ्यावी, त्याप्रमाणें गोखल्यांकडे त्यांचें मन ओढलें गेलें. एका मित्राकरवीं त्यांनीं गोखल्यांना आपल्या भेटीस बोलाविलें. 'हा आपला योग्य वारस आहे' असें पहिल्याच भेटींत रानड्यांनीं ताडलें.

'बारा वर्षें रानड्यांच्या चरणांजवळ आदरानें व नम्रपणानें बसण्याचें भाग्य मला लाभलें,' असे उद्गार गोखले वारंवार काढीत. ह्या बारा वर्षांत, निरनिराळ्या प्रसंगीं, निरनिराळ्या क्षेत्रांतील, रानड्यांचे गुण गोखल्यांच्या दृष्टीस पडले व मनावर ठसले. एकदा १८९७ सालीं, अमरावतीची कॉंग्रेस आटोपून हे गुरुशिष्य आगगाडीनें परत येत होते. रात्रीं दोघे झोपले. पहाटे चार वाजतां गोखले जागे झाले. पाहातात तों रानडे डोळे मिटून बसलेले आणि

पा.नं.
८८४




‘ जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ’ हा तुकाराममहाराजांचा अभंग तल्लीन होऊन म्हणत आहेत. पहाटेची प्रसन्न वेळ, भोंवतालचें शांत वातावरण, रानांतील शीतल वारे, —अशा मंगल प्रसंगीं शांतिब्रह्म रानड्यांच्या मुखांतून ‘ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ’ हा भक्तिरसांत घोळलेला चरण कानांवर



तुकाराममहाराज

पडतांच गोपाळरावांच्या श्रद्धाळू अंतःकरणाला वाटलें, तो साधु, तो देव तर माझ्यापुढेंच बसलेला आहे. पुढें एकदा गोखल्यांनीं असें स्वच्छ बोलूनच दाखविलें कीं ‘ रानड्यांच्या सान्निध्यांत असतांना हीन विचार मुखांतून बाहेर पडत नाहींत, किंबहुना मनांतही येत नाहींत. ’





दादाभाई नौरोजी

रानडे गोखल्यांना पद्धतशीर मार्गदर्शन करीत असत. पुढें ‘सार्वजनिक सभेच्या’ चिटणीसपदाची माळ त्यांनीं गोपाळरावांच्या गळ्यांत घातली. १८९० ते १८९६ पर्यंत गोखले चिटणीस होते. त्या सभेचें त्रैमासिक लोकांत व सरकारांत वजनदार मानलें जात असे. त्याच्या संपादकत्वाचीं सूत्रेंही रानड्यांनीं गोखले ह्यांच्या हातीं दिलीं. त्याच्या सत्तावीस अंकांत त्यांनीं एकोणपन्नास लेख लिहिले. आंकडेबद्ध, माहितीपूर्ण व युक्तिवादयुक्त लेख लिहिण्याचा ते कसोशीनें प्रयत्न करीत. असा आपला लेख पाहून, रानड्यांनीं ‘चालेल, द्या छापावयास’ असे साधे शब्द जरी उच्चारिले, तरी गोखल्यांना आपल्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें वाटे. ‘त्यांची प्रशस्ति म्हणजे ह्या पृथ्वीतलावरील सर्वांत श्रेष्ठ पारितोषिक’ असें गोखले मानीत व बोलूनही दाखवीत. त्यांनीं सार्वजनिक सभेची सहा वर्षांची ही सेवा निर्वेतनच केली.

असामान्य बुद्धिमत्ता, चिकाटीचा उद्योग, शिस्तशीर अभ्यास, नीतिशुद्ध राहाणी आणि सदैव राष्ट्रकल्याणाचा ध्यास, ह्या रानड्यांच्या पांच गुणांचा गौरव गोखले मुक्तकंठानें करीत. विशेषत: शेवटच्या गुणाच्या बाबतींत, म्हणजे अहोरात्र देशहिताचें चिंतन करण्यांत, रानडे व दादाभाई नौरोजी ह्यांच्या तोडीचा तिसरा माणूस हिंदुस्थानांत नाहीं, असें गोखले मानीत. हे गुण आपल्यामध्यें उतरावेत म्हणून गोखले पराकाष्ठेचे परिश्रम करीत. ‘ज्या राष्ट्रामध्यें

रानडे निर्माण होतात, त्याला निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं ' अशी गोखल्यांची अपार श्रद्धा.

रानड्यांप्रमाणें रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी ह्यांचाही उपयोग गोखल्यांना पुष्कळ झाला. अर्थशास्त्राच्या अभ्यासाची दिशा त्यांनीं गोखल्यांना दाखविली. त्यांच्याकडे गोखल्यांना रानड्यांनींच पाठविलें. त्या वेळीं ता. १६ फेब्रुवारी १८९० रोजीं लिहिलेल्या पत्रांत न्या. रानडे, रा. ब. जोशी ह्यांस लिहितात, ' गेले सहा महिने गोखले मजबरोबर काम करीत आहेत. ह्या अवधींत, त्यांचे गुण फार थोर असल्याची माझी खात्री झाली आहे. परिस्थिति कशीही असो, आपण आपलें काम सिद्धीस नेण्याची पराकाष्ठा करण्यास ते तत्पर असतात. मुख्य म्हणजे बुद्धीनें व नीतीनें ते अगदीं सच्चे आहेत.'

पुढें सहा वर्षांनीं कलकत्ता काँग्रेसला हे गुरुशिष्य गेले होते. तेथें गोखल्यांची ओळख करून देतांना रानडे म्हणाले, " ह्या होतकरू तरुणाची गणना हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांत लवकरच होईल." १८९० सालीं कलकत्ता येथें भरलेल्या राष्ट्रसभेंत गोखल्यांनीं पहिलें भाषण केलें. त्या वेळीं त्यांचें वय अवघें चोवीस वर्षांचें होतें. त्यांचें भाषण लहानच होतें, पण मुद्देसूद होतें. प्राप्तीवरील कर रद्द करावा असें ते बोलले. पुढें राष्ट्रसभेच्या अनेक अधिवेशनांत त्यांनीं परिणामकारक भाषणें केलीं. विशेष म्हणजे, १८९४ सालीं, मद्रास येथील अधिवेशनांत गोखले व टिळक एकाच विषयावर, एकाच विचारानें बोलले. मात्र त्यांचें हें ऐक्य दैवाला फार काळ पाहवलें नाहीं.



# विरोधाचीं वादळें

"हरिभाऊ, तुम्हांला आपल्या आयुष्यांत पुढें काय व्हावंसं वाटतं ?" गोपाळरावांनीं प्रश्न केला.

"समाजास मार्गदर्शक असा कादंबरीकार होण्याची माझी इच्छा आहे." हरिभाऊ उत्तरले. आणि त्यांनीं उलट सवाल टाकला, "आणि गोपाळराव, तुम्हांला हो कोण होण्याची इच्छा आहे ?"

"मंत्री होऊन देशाची सेवा करावी, ही आहे माझी महत्त्वाकांक्षा." गोपाळरावांनीं निश्चित उत्तर दिलें.

हरिभाऊ आपटे व गोपाळराव गोखले ह्या दोन मित्रांमधील हा संवाद. त्या दोघांचा स्नेह १८८७ सालीं जमला; त्यानंतर थोड्याच दिवसांत हा संवाद झाला. दोघांनींही आपापल्या इच्छा



हरिभाऊ आपटे

तंतोतंत पुऱ्या केल्या हें विशेष. दोघेही पन्नाशीच्या आंतबाहेरच मृत्यु पावले, पण आपलें जीवित-ध्येय गांठून.

न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत असतांनाच गोखले सार्वजनिक सेवेस लागले होते; रानडे-जोशी ह्यांच्या मार्गदर्शनानें अर्थशास्त्रांत ते तरबेज झाले होते. सार्वजनिक सभेचे चिटणीस व तिच्या त्रैमासिकाचे संपादक ह्या नात्यानें जनतेची सेवा ते करीत होते. राष्ट्रीय सभेंत तर ते १८९० सालापासून भाग घेत होते. पुढें ते राष्ट्रसभेचे चिटणीस झाले, एवढेंच नव्हे तर बनारसच्या अधिवेशनाचे अध्यक्षही झाले.

मुंबईच्या प्रांतिक विधिमंडळाचे ते सभासद होते, तसेच दिल्लीच्या कौन्सिलचेही ते सदस्य होते. तेथें ते 'विरोधी पक्षाचे प्रमुख' ह्या पदास चढले व सरकाराचे निर्भीड टीकाकार बनले. तरीही त्यांच्या सखोल व्यासंगाबद्दल व निर्लोभी देशभक्तीबद्दल सरकारनें त्यांना सी. आय्. ई. ही पदवी दिली. मुंबई विद्यापीठाचे फेलो, पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष अशीं अधिकारस्थानें तर त्यांच्याकडे लोटांगणें घालीत आलीं. इंग्लंडमध्यें सात सफरी काढून त्यांनीं तेथील राज्यकर्त्यांचें मत हिंदुस्थानबद्दल शक्य तितकें अनुकूल करून घेतलें.

आफ्रिकेंतील हिंदी देशबांधवांचा उद्धार करण्यासाठीं गांधीजींनीं वीस वर्षेंपर्यंत सत्याग्रहाचा जो अपूर्व लढा चालविला, त्याला हिंदुस्थानांतून आर्थिक व नैतिक पाठिंबा गोखले ह्यांनीं दिला, एवढेंच



गांधीजी

नव्हे, तर आफ्रिकेंत जाऊन, रात्रीचा दिवस करून, आपलें सर्व बुद्धि-चातुर्य व वक्तृत्ववैभव पणाला लावून, त्यांनीं त्या लढ्यास साहाय्य केलें.

न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज ह्यांच्या लहानशा जगांतून निघून हिंदुस्थान, इंग्लंड व आफ्रिका ह्यांच्या त्रिखंडांत आपलें कर्तृत्व दाखविण्यासाठीं गोखले जेव्हां बाहेर पडले, तो प्रसंग मोठा हृदयस्पर्शी होता. गोखल्यांचें चतुरस्र ज्ञान, त्यांचें इंग्रजी भाषेवरील अलौकिक प्रभुत्व आणि त्यांचें असामान्य वक्तृत्व ह्यांमुळें गोखल्यांवर विद्यार्थि-वर्ग प्रसन्न असे. गणित, इतिहास व अर्थशास्त्र हे विषय ते अभ्यासपूर्वक शिकवीत असत. त्यांनीं अंकगणिताचें एक इंग्रजी पुस्तक १८८७ सालीं लिहिलें. त्याचा खूप प्रसार झाला. इतका कीं त्यापासून दरमहा १२५ रुपये प्रकाशकाकडून त्यांना सतत मिळत. त्याच्या मराठी भाषांतराच्या पंचवीस एक आवृत्त्या निघाल्या. संस्थेसाठीं निधि जमविण्याचें जिगाजिगीचें कामही त्यांनीं केलें. सोळा वर्षें शाळा-कॉलेजांत अध्यापनाचें कार्य केल्यावर दोन वर्षांची रजा घेऊन त्यांनीं त्या संस्थेचा निरोप घेतला. त्या वेळीं, ता. १९ सेप्टेंबर १९०२ रोजीं विद्यार्थ्यांनीं त्यांना मानपत्र दिलें. त्याला उत्तर देतांना गोखल्यांचें भावनापूर्ण हृदय उचंबळून आलें.

ते म्हणाले, " ह्या संस्थेपासून मी स्वतःला वेगळा समजूंच शकत नाहीं. सुखदु:खाचे, अंधाराप्रकाशाचे नानाविध प्रसंग मीं इथें अनुभवले. आतां मी ज्या सार्वजनिक जीवनांत प्रवेश करीत आहें, तें जीवन म्हणजे एक अज्ञात व तुफान समुद्रच आहे. त्यांत माझ्या आयुष्याची नाव फुटेल वा तरेल, पण मी देशाविषयींचं आपलं कर्तव्य बजावण्याच्या एकाच भावनेनें त्या समुद्रांत माझी नाव लोटीत आहें. "

ह्या सार्वजनिक जीवनांत त्यांचा विरोध आला टिळकांशींच ! टिळकांचा कित्ता डोळ्यांपुढें ठेवून व त्यांच्याविषयीं आदरभाव बाळगून गोखले न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिरलेले, पण दोघांचीं मतें स्वतंत्र, दोघांचे स्वभाव भिन्न. त्यामुळें खटके उडाले. एका बाजूला टिळक व एका बाजूला आगरकर असा सामना सुरू झाल्यावर, गोखले आगरकरांच्या बाजूस राहिले. पुढें आगरकरांनीं 'केसरी' सोडला व 'सुधारक' काढला. त्या 'सुधारका'च्या इंग्रजी विभागाचे संपादक म्हणून गोखल्यांनीं लेखन केलें. पुढें न्या. रानडे ह्यांच्या नेतृत्वाखालीं, सार्वजनिक सभेंत गोखले काम करूं लागले, पण तेथेंही टिळकांच्या जहाल पक्षानें प्रवेश केला आणि मवाळ पक्षाला हुसकून लावलें. त्यामुळें ता. ४ नोव्हेंबर १८९६ रोजीं, गोखल्यांना 'डेक्कन सभा' मोठ्या नाखुषीनें स्थापन करावी लागली. तसें करतांना त्यांच्या मनाला विलक्षण यातना झाल्या.

ह्या केवळ चकमकी झाल्या. खरें युद्ध पुढेंच होतें. १९०७ सालीं सुरत येथें कॉंग्रेसचें जें अधिवेशन भरलें, तें खरें समरांगण ! गोखल्यांच्या नेमस्त पक्षानें एक अध्यक्ष निवडले, त्या अध्यक्षांनीं

आपलें भाषणही सुरू केलें; पण त्याला विरोध करण्यासाठीं, टिळक व्यासपीठावर जाऊन उभे राहिले. अध्यक्षांच्या निवडणुकीबद्दल आपण कांहीं सूचना मांडणार आहोंत अशी लेखी वर्दी त्यांनीं आगाऊच दिली होती. ते बोलूं लागले. नेमस्त लोक जहाल बनले, आरडाओरडा करूं लागले, काठ्या-लाठ्या सरसावूं लागले, खुर्च्या-जोडे फेकूं लागले, टिळकांचें जीवित धोक्यांत आलें. त्या वेळीं गोखले निश्चयानें गरजले, " टिळकांच्या एका केसालाही धक्का लागला तर इथें रक्तपात होईल. ही दंगल ताबडतोब थांबवा."

पोलीस आले व त्यांनीं शांतता निर्माण केली. टिळकांशीं गोखल्यांचा कितीही तात्त्विक विरोध असला, तरी त्यांची थोरवी ते पुरेपूर जाणत होते आणि त्यांना धक्का लागावा हें गोखल्यांना असह्य वाटत होतें. टिळक व गोखले ह्यांच्यामध्यें मतभेद व विरोध कितीही तीव्र असला, तरी ते दोघेही एकमेकांची देशभक्ति पूर्णपणें जाणून होते.

ह्या झगड्यांत जे दोन प्रवाह निघाले, ते पुढें वाढतच गेले. कारण, स्वभावाच्या ह्या दोन प्रवृत्ति होत्या; कार्यांच्या ह्या दोन परंपरा होत्या. गोखल्यांचा जसा रानडे-पंथ, तसा टिळकांचा चिपळूणकर-पंथ. ह्या पंथांनाच पुढें नेमस्त ( मवाळ ) आणि राष्ट्रीय ( जहाल ) अशीं नांवें पडलीं. नेमस्त पक्षाचे डोळे सरकारकडे, तर राष्ट्रीय पक्षाचें लक्ष जनतेकडे. ब्रिटिश सरकार स्वराज्याचें जांभूळ आपल्या तोंडांत टाकील अशी आशा नेमस्तांना; तर लोकांना जागें करून, संघटित करून, निर्भय बनवून, सरकारी अन्यायाशीं टक्कर देण्यास व स्वराज्याचे हक्क हिसकावून घेण्यास समर्थ बनविणें हें राष्ट्रीय पक्षाचें ध्येय.



व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन

न्या. रानडे काय किंवा ना. गोखले काय, दोघांना अगदीं प्रामाणिकपणें वाटे, परमेश्वरानेंच हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं इंग्रजांचें राज्य येथें आणलें आहे आणि आपण आपली लायकी वाढविली व शाबीत केली, म्हणजे योग्य वेळीं, इंग्रज सरकार आपलें राज्य आपल्याला परत देईल. आजारी माणसाला आपण दवाखान्यांत नाहीं का पाठवीत ? तेथें तो बरा झाला कीं लगेच डॉक्टर त्याला घरीं पाठवितो. तसाच प्रकार उदारमतवादी इंग्लंड करील असा ना. गोखले ह्यांचा विश्वास. ' आज ना उद्यां आमच्या विरोधाचा परिणाम सरकारवर होईल आणि राज्यकारभार सुधारेल, ' अशी आशा त्यांना वाटे, म्हणून ते जीव तोडून भाषणें करीत. विशेषत:, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करावें, म्हणून त्यांनीं जोरानें टाहो फोडला. १९१० व १९१२ ह्या दोन सालांत त्यांनीं त्याचें बिल मांडलें, पण स्वार्थी इंग्रज सरकारनें त्यांचें कांहींही ऐकलें नाहीं. व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन, भारतमंत्री लॉर्ड मोर्ले, वगैरे मोठ्यांतले मोठे इंग्रज अधिकारी त्यांच्या वक्तृत्वाची खूप तारीफ करीत, त्यांचें



भारतमंत्री लॉर्ड मोर्ले

मागणें योग्य असल्याचेंही कबूल करीत, पण शेवटीं त्यांना वाटाण्याच्या अक्षताच लावीत. सत्तेपुढें शहाणपण काय कामाचें!

निराशेच्या अशा ठेचा लागल्यानंतरही गोखले म्हणत, सरकारचा अन्याय आपण निषेध न करतां सोसण्यापेक्षां निषेध करून सोसणें चांगलें. " महाराज, एक विनंती, एक सूचना आपल्या कानीं घालण्यासाठींच मीं माझा नम्र स्वर इथें उमटविला आहे. ह्यापुढील कार्य परमेश्वराच्या हातीं आहे. " असे दबलेल्या रागाचे उद्गारही गोखले कधीं कधीं काढीत. टिळकांना हा परमेश्वर जनतेमध्यें आहे असें वाटे आणि त्याला जागें करण्याचा प्रयत्न ते करीत. मिठावरील कर कमी करण्यासारख्या चिल्लर सुधारणा सरकार केव्हां केव्हां करीत असे, त्यामुळें नेमस्त पक्षाच्या आशेला पालवी फुटे. पण बंगालची फाळणी रद्द करणें किंवा नोकरशाही हिंदी करणें अथवा कायदेमंडळें लोकतंत्र बनविणें, इत्यादि महत्त्वाच्या सुधारणा सरकार नेमस्तांच्या आर्जवामुळें, आळवणीमुळें, आग्रहामुळें करण्यास तयार नसे. त्यासाठीं टिळक-पक्षाचा ठोसाच उपयोगी पडे.


हा फरक पाहिल्यानंतर गोखले कधीं कधीं वैतागाची भाषा काढीत. " समंजस माणसांचा सल्लाही सरकार जर असा झाडून टाकणार असेल आणि साऱ्या हिंदी माणसांना 'मुकीं बिचारीं कुणी हांका' अशा जनावराप्रमाणेंच वागविणार असेल, तर सहकार्याला रामरामच ठोकला पाहिजे " असें ते म्हणत. बनारस येथें, १९०५ सालीं भरलेल्या राष्ट्रसभेच्या अध्यक्षस्थानावरून गोखल्यांनीं असेच जळजळीत उद्गार काढले. ते ऐकून सरकारला वाटलें,

गोखले टिळक झाले. चिरोल नांवाच्या इंग्रज लेखकानें असें स्पष्टच म्हटलें कीं "टिळकांनीं अभिमान मानावा असा हा प्रसंग होता, कारण ह्या वेळीं गोखले टिळकांच्या हातांत गेले. टिळकांचें बहिष्कार-शस्त्र गोखल्यांनींही मान्य केलें." पुढें तर त्यांनीं करबंदीची चळवळही सनदशीरच आहे असें आपलें मत जाहीर करून सरकारला



सर फेरोझशहा मेथा

चकित केलें. प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीनें पाहातां, मुंबई कौन्सिलांत शेतसाऱ्याच्या बिलाचा त्यांनीं निषेध केला, एवढेंच नव्हे तर, सर फेरोझशहा मेथा ह्यांच्यामागोमाग त्यांनीं 'सभात्याग' ही केला.



# राष्ट्र-सभेचे अध्यक्ष

नामदार गोखले ह्यांच्या उत्कर्षाचा मध्यबिंदु म्हणजे १९०५ साल. माध्यान्हींच्या सूर्याप्रमाणें त्यांचें कर्तृत्व ह्या वेळीं पूर्ण तेजानें तळपत होतें. त्या वर्षीं मे महिन्यांत, मुंबई येथें जाहीर सभा भरवून गोखल्यांस विलायतेस पाठविण्याचें ठरलें. बंगालची फाळणी रद्द करून घेण्यासाठीं, ते विलायतेस निघाले.

ह्यापूर्वीं १८९७ सालीं ते इंग्लंडला प्रथम गेले होते. सरकारनें आर्थिक चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या वेल्बी कमिशनपुढें त्यांनीं त्या वेळीं उत्कृष्ट साक्ष दिली. तिची वाहवा सर्वांनीं केली. पण त्या पहिल्या सफरींत गोखल्यांच्या पदरीं दुसरें एक मोठें अपयश आलें.

इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत त्यांची मोठी नापत झाली. त्या सुमारास पुण्यांत प्लेगनें कहर केला होता. त्याहूनही अधिक कहर केला सरकारच्या गोऱ्या सैनिकांनीं. त्यांच्या अत्याचारांच्या बातम्या येथील मित्रांनीं गोखल्यांना इंग्लंडांत कळविल्या. त्यांच्या आधारानें गोखल्यांनीं इंग्लंडांतील एका वृत्तपत्रांत एक मुलाखत दिली आणि गोऱ्या सोजिरांच्या वर्तनावर सणसणीत टीका केली. तेव्हां इंग्लंडांत मोठी खळबळ माजली. त्यामुळें मुंबई सरकार कावरेंबावरें झालें. गोखले हिंदुस्थानांत परत येतांच मुंबई सरकारनें त्यांच्यामागें लकडा लावला कीं "सोजिरांवरील आरोप सिद्ध करा, नाहींतर माफी मागा."

आरोप खरे असले तरी ते सिद्ध करण्यासाठीं पुरावे मिळेनात. पूर्वीं कोल्हापूरकर मित्रांनीं जसें टिळक-आगरकरांना तोंडघशीं पाडलें आणि दिवाण बर्वे ह्यांची माफी मागावयास लावलें, त्याप्रमाणेंच पुणेंकर मित्रांनीं गोखल्यांना एकटे सोडलें आणि त्यामुळें गोखल्यांना माफी मागणें भाग पडलें. ह्या माफीमुळें गोखल्यांना जनतेला तोंड दाखविण्याची लाज वाटूं लागली. इंग्लंडमधील कॉमन्स सभेंत 'एक थापाड्या' अशी त्यांची निर्भर्त्सना करण्यांत आली. हें माफी-प्रकरण त्यांच्या हृदयांत शल्याप्रमाणें बोचत राहिलें. माफीचा हा कलंक धुवून काढावा म्हणून ते दिल्लीच्या वरिष्ठ कौन्सिलमध्यें १९०२ सालीं गेले. तेथें त्यांनीं आपली कामगिरी इतक्या उत्तम रीतीनें बजावली कीं १९०४ सालीं त्यांना सरकारनें सी. आय्. ई. ही पदवी बहाल केली. अशा उजळ माथ्यानें व उच्च अधिकारानें गोखले १९०५ सालीं विलायतेस गेले. तेथें पन्नास दिवसांत

******************
पंचेचाळीस व्याख्यानें त्यांनीं दिलीं आणि तेथील लोकांच्या कानांवर हिंदुस्थानांतील लोकमत घातलें.

त्या वर्षीं व पुढील वर्षींही गोखले ह्यांनीं दुसरी एक महत्त्वाची कामगिरी केली. स्वराज्याचे अधिकार हिंदुस्थानला जास्तींत जास्त मिळावेत म्हणून त्यांनीं इंग्लंडांतील मुत्सद्द्यांचें मन वळविण्याची पराकाष्ठा केली. भारतमंत्री लॉर्ड मोर्ले ह्यांच्यावर तर त्यांनीं विलक्षण छाप पाडली. 'गोखल्यांचें धोरण मला आकर्षक व परिणामकारक वाटलें.' असें मोर्ले ह्यांनीं आपल्या आठवणींत लिहून ठेवलें आहे. मोर्ले म्हणतात, "गोखल्यांचें डोकें मुत्सद्द्याचें आहे. राज्यकारभाराची जबाबदारी ते ओळखतात आणि व्यवहारांत शक्य काय, अशक्य काय हें जाणण्याची त्यांना नजर आहे."

'तुम्ही भले, आम्ही भले, स्वराज्याचें दान राहिलें' असें धोरण मोर्ले ह्यांचें होतें. गोखले हिंदुस्थानसाठीं मागत होते काय? तर फक्त वसाहतीचें स्वराज्य, पूर्ण स्वातंत्र्य नव्हे. तरी मोर्ले बजावतात, हें केवळ स्वप्न आहे. हिंदी स्वराज्याचा चांदोबा मोर्ले ह्यांना आपल्या दुर्बिणींतून दिसेचना. उलट ते गोखल्यांना अशी दमदाटी करूं लागले, "हिंदुस्थानांतील तुमच्या मित्रांना आवरा, त्यांना आपला अविचार आणि हेकटपणा सोडून देण्यास सांगा. स्वराज्याच्या अशक्य मागण्यांसाठीं होणारा ओरडा थांबवा, नाहींतर सुधारणांचं सारंच मुसळ केरांत जाईल!"

आणि इतक्या खबरदारीनें व गाजावाजानें, तीन वर्षांच्या वाटाघाटीनंतर, मोर्ले-साहेबांनीं १९०९ सालीं ज्या सुधारणा जाहीर केल्या, त्या कसल्या? तर हिंदु व मुसलमान ह्यांत फूट पाडणाऱ्या. भ्रमाचा

भोपळा फुटला ! गोखल्यांनीं आपल्या विद्वत्तेच्या तुपांत तळलें, वक्तृत्वाच्या साखरेंत घोळलें, तरी ब्रिटिशांच्या स्वराज्यदानाचें कारलें कडू तें कडूच !



डॉ. देशमुख

पण गोखल्यांनीं आपलें कर्तव्य मोठ्या परिश्रमानें पार पाडलें ह्यांत शंका नाहीं. भाषणें करकरून त्यांचा घसा दुखूं लागला. ते हिंदुस्थानला यावयास निघाले. बोटीवर असतांनाच त्यांच्या घशावर शस्त्रक्रिया करावी लागली. ते मुंबईस आले, तेव्हां त्यांचा मोठा सत्कार झाला. पुण्यानें तर त्यांचें स्वागत फारच थाटानें केलें. टिळक वगैरे सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं त्यांचा मोठा गौरव केला. डॉ. देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांना मानपत्र अर्पण करण्यांत आलें. टिळकांनीं केसरींत त्यांचा फोटो छापून तोंड भरून त्यांची तारीफ केली. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनींही गोखल्यांच्या गौरवाचा एक विस्तृत लेख लिहिला.



इतिहासाचार्य राजवाडे

राष्ट्रीय सभेनें तर त्यांना १९०५ सालच्या बनारस येथील अधिवेशनाचें सिंहासनच बहाल केलें. ब्रिटिश राज्यानें हिंदुस्थानची किती दुर्दशा झाली आहे, हें त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत

आंकड्यापुराव्यानिशीं ठसठशीतपणें मांडलें. "इंग्रजी राजवट हिंदुस्थानांत शंभर वर्षं आहे, तिचं फल काय? तर पांच खेड्यांपैकीं चारांमध्यें एकही शाळा नाहीं आणि आठांपैकीं सात मुलें अज्ञानाच्या अंधकारांत चाचपडत आहेत." अशी टीका त्यांनीं सरकारवर केली. बंगालची फाळणी करणारे लॉर्ड कर्झन ह्यांची तुलना त्यांनीं औरंगजेबाशीं केली. ती फाळणी रद्द करण्यासाठीं ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा असेंही त्यांनीं सांगितलें. शेवटीं न्या. रानड्यांच्या स्फूर्तिदायक शब्दांनीं त्यांनीं आपल्या भाषणाचा समारोप केला. ह्या वेळीं त्यांचें वय अवघें एकोणचाळीस वर्षांचें होतें. इतक्या लहान वयांत दुसरा कोणताही नेता राष्ट्रसभेचा अध्यक्ष आतांपर्यंत झालेला नाहीं.

'येथील प्रत्येक माणूस प्रथम हिंदी आहे, मग हिंदु, मुसलमान वगैरे' हें निर्भेळ देशभक्तीचें सूत्र त्यांनीं देशभर पुनःपुनः ठासून सांगितलें. त्यामुळें गोखले हे सर्व जमातींना आपलेसे वाटत. १९०६ सालीं, ते अलीगड येथें गेले असतांना मुसलमान समाजानेंही त्यांचा टोलेजंग सत्कार केला. रस्त्यावर सुंदर कमानी उभारल्या होत्या, मिरवणुकीपुढें हत्ती झुलत होते आणि गोखल्यांच्या गाडीचे घोडे सोडून हिंदु-मुसलमानांनीं स्वतः ती गाडी ओढली. मानपत्रें व मुलाखती ह्यांचा तर नुसता पाऊस पडला. गोखल्यांची देशभक्ति सरकारी पदवीमुळें राजमान्य झालीच होती; ती आतां राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदानंतर लोकमान्यही ठरली.

इंग्लंडांतील चळवळ व हिंदी राष्ट्रसभेचें अध्यक्षपद ह्या दोन महत्कार्यांइतकेंच संस्मरणीय कार्य गोखले ह्यांच्या हातून १९०५

सालींच घडलें. तें म्हणजे 'भारत सेवक समाज'ची (Servants Of India Society) स्थापना. हें त्यांचें कार्य पहिल्या दोन कार्यांहून दीर्घकाल टिकणारें आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचें सारसर्वस्व त्यांत सांठलेलें आहे. त्यांच्या जीवितकार्याचें तें जिवंत स्मारक आहे. त्यांच्या गुणांची गंगा सदैव वाहाती ठेवणारी ही संस्था इतरांना मार्गदर्शक ठरलेली आहे. त्यांचे स्नेही श्री. हरिभाऊ आपटे ह्यांनीं दहा वर्षें आधीं आपल्या प्रतिभेनें अशा संस्थेचें स्वप्न पाहिलें होतें व 'मी' ह्या कादंबरींत तें रेखाटलेंही होतें. देशांतील 'चतुःकोण अज्ञानाचा विध्वंस करण्यासाठीं' कसे 'व्रती' निघावेत ह्याचा आदर्श त्यांनीं त्या कादंबरींत 'भावानंदा'च्या रूपानें दाखविला आहे. §

मराठी ग्रंथ संग्रहालय

§ कादंबरीकाराची कल्पना-सृष्टि मुत्सद्द्यानें सत्य-सृष्टि करून दाखविली. गोखल्यांचा 'भारत सेवक समाज' ही भारताला अमोल देणगीच आहे.



# भारत-सेवकांची खाण

“म र फेरोझशहा मला हिमालया-सारखे दिसले, लोकमान्य समुद्रासारखे भासले, गोखले गंगेसारखे वाटले, तिच्यांत मला स्नान करतां येण्यासारखें होतें ....”

“ .... हिमालय चढून जाणें अशक्य, समुद्रांत बुडण्याची धास्ती, पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी, तिच्यावर मजेनें होडी खेळवावी.” हे गांधीजींचे १८९६ सालचे उद्गार.

पहिल्याच भेटींत गांधीजींना गोखल्यांनीं आपल्याकडे ओढलें. जणुं कांहीं त्यांची पूर्वींचीच ओळख आहे, असें गांधीजींना प्रथम भेटींतच वाटलें. पुढें तर गांधीजींनीं गोखल्यांना गुरुस्थानींच मानलें.

इतकी जवळीक, इतकी आपुलकी गांधीजींना कां वाटली? त्या वेळीं दोघांच्याही स्वभावधर्मांत व ध्येयवादांत पुष्कळसें साम्य होतें. दोघांचींही मनें अत्यंत हळुवार, कोमल, प्रेमळ, श्रद्धापूर्ण व भावनाशील आणि दोघांचेंही ध्येय आध्यात्मिक स्वरूपाचें. देशाचें स्वातंत्र्य मिळविणें व त्यासाठीं राजकारण करणें, चळवळी चालविणें, इत्यादि राजकीय कामें त्या दोघांनींही आयुष्यभर केलीं असलीं, तरी त्यांच्या जीवनाचा ध्रुवतारा ईश्वरसेवा हाच. दोघांचीही ईश्वरावर दृढ श्रद्धा. त्याच्या योजनेनेंच इंग्लंड-हिंदुस्थानचा संबंध जडलेला आहे अशी दोघांचीही समजूत आणि इंग्लंडांतील उदारमतवादी लोक, योग्य वेळीं, आपखुषीनें, हिंदुस्थानला स्वराज्य देतील असा विश्वास दोघांचाही.

"आपलें सार्वजनिक जीवन अध्यात्माच्या भूमिकेवरून चाललें पाहिजे. ( Public life must be spiritualised )" हा गोखल्यांचा जीवनमंत्र. त्यानें गांधीजी मोहित झाले. ह्याच मंत्रानें गोखल्यांनीं आपल्या संस्थेची प्राणप्रतिष्ठा केली. अशी संस्था स्थापन करण्याचे विचार त्यांच्या मनांत १८९७ सालापासून चालू होते. त्यांच्या डोळ्यांपुढें महाराष्ट्रांतील रामदासपंथाचें कार्य होतें, तसेंच युरोपमधील जेसुइट पंथाची कामगिरीही होती. न्यू इंग्लिश स्कूल स्थापन करतांनाही चिपळूणकर वगैरेंच्या डोळ्यांपुढें असेंच दाखले होते. तशाच निःस्वार्थी व नीतिमान राष्ट्रसेवकांची परंपरा निर्माण करणें हें त्यांचें ध्येय होतें. पण तें शाळा-कॉलेजें व वर्तमानपत्रें एवढ्यापुरतेंच मर्यादित होतें. त्यापेक्षां विशाल कल्पना गोखल्यांनीं मनीं धरली आणि संस्थेची व्यापक योजना आंखली.



लाला लजपतराय



देवधर



द्रवीड

देशांत हिंडून, समाजसेवेचीं नानाविध कार्यें करून, मिशनऱ्यांचा बाणा धारण करून, आपल्या राष्ट्राचा उद्धार करणारे चारित्र्यसंपन्न व कर्तृत्वसंपन्न असे त्यागी व श्रद्धाशील कार्यकर्ते अखंड निर्माण करावेत म्हणून, ता. १२ जून १९०५ रोजीं, गोखल्यांनीं 'भारत सेवक समाज' (Servants of India Society)' स्थापन केला. हें गोखल्यांचें कर्तृत्व डोंगराएवढें मोठें आहे. ह्या संस्थेचा कित्ता डोळ्यांपुढें ठेवूनच लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांनीं पुढें राष्ट्रसेवकांच्या संस्था स्थापल्या.

पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजच्या पिछाडीस जी एक टेकडी आहे, तिच्यावर, समोर क्षितिजावर उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून, ना. गोखले ह्यांनीं देशसेवेची शपथ घेतली आणि देवधर-द्रवीड-पटवर्धन ह्या आपल्या तिघा सहकाऱ्यांनाही त्या शपथेची दीक्षा दिली. ह्यापुढें ह्या संस्थेला ना. शास्त्री, श्री. ठक्करबाप्पा ह्यांजसारखे अनेक

Marathi Granth Sangrahal


निष्ठावंत कार्यकर्ते लाभत गेले. राजकीय जीवन संघटितपणें व सहकार्यानें चालविण्याची एक नवीनच परंपरा गोखल्यांनीं निर्माण केली. त्यांच्या संस्थेंतील सभासदाला पुढील शपथा घ्याव्या लागतात :



पटवर्धन



नामदार शास्त्री

( १ ) माझ्या डोळ्यांपुढें सदैव देशाच्याच कल्याणाची गोष्ट प्रथम राहील; मजमध्यें जें कांहीं उत्कृष्ट आहे तें तें सर्व मी आपल्या देशाच्या सेवेस अर्पण करीन. ( २ ) देशाची सेवा करितांना स्वार्थलोलुपता मी मनांत येऊं देणार नाहीं. ( ३ ) सर्व हिंदी लोकांस मी भाऊ असें समजेन आणि सर्वांच्या उन्नतीसाठीं पंथ व जात बाजूस ठेवून मी प्रयत्न करीन. ( ४ ) माझ्या किंवा माझ्या कुटुंबासाठीं सोसायटी जें कांहीं देईल त्यांतच मी आनंद मानीन. स्वतःसाठीं ह्याहून अधिक पैसा मिळविण्याच्या भरीस मी पडणार नाहीं. ( ५ ) मी आपलें खाजगी आचरण



निष्ठावंत ठक्करबाप्पा

पवित्र ठेवीन. ( ६ ) मी कोणाबरोबर खाजगी, व्यक्तिगत भांडणें भांडणार नाहीं. ( ७ ) सोसायटीचें ध्येय सदोदित मी डोळ्यांसमोर ठेवीन. शक्य तितक्या कळकळीनें व उत्कटतेनें मी सोसायटीच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करीन. सोसायटीच्या ध्येयाला प्रतिकूल असें मी कांहीं करणार नाहीं.

ह्या शपथांप्रमाणें वागण्याचा गोखले जास्तींत जास्त प्रयत्न करीत. द्रव्याचा तर मोह त्यांनीं कधींच झुगारला होता. ' सर ' ही बहुमानाची पदवी सरकारनें देऊं केली असतां तीही त्यांनीं साभार परत पाठविली. त्यांची देशभक्ति निःस्वार्थी व निरलस होती. अशा उच्च ध्येयानें व शुद्ध नीतीनें चालणारे गोखले गांधीजींना जवळचे वाटले ह्यांत नवल काय ? १८९४ सालापासून गांधीजींनीं आफ्रिकेंतील हिंदी लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठीं कंबर बांधली होती. त्यांना हिंदुस्थानांतून जास्तींत जास्त पाठिंबा व मदत कोणीं दिली असेल, तर ती गोखल्यांनींच. १९०१ सालीं, गांधीजी हिंदुस्थानांत आले आणि कलकत्ता कॉंग्रेसला हजर राहिले. कॉंग्रेसनें आपल्याला सहानुभूति व साहाय्य द्यावें अशी गांधीजींची इच्छा.

पण फेरोझशहांनीं त्यांना चक्क सांगितलें, " गांधी, तुमचं काम होण्यासारखं नाहीं. आमच्या देशांतच आम्हांला कितीसे हक्क आहेत ?" पण गोखल्यांनीं गांधीजींचा प्रश्न हातीं घेतला. आपला सख्खा धाकटा भाऊ असावा तसें त्यांनीं गांधीजींना वागविलें. त्यांच्या वजनामुळें कॉंग्रेसमध्यें आफ्रिकेच्या ठरावासाठीं फक्त पांच मिनिटें देण्यांत आलीं ! पुढें गांधीजी कलकत्त्यांत महिनाभर राहिले. त्या महिन्यांत त्यांना गोखल्यांचा निकट सहवास लाभला. त्या

सहवासांत त्यांना गोखल्यांचे कोणकोणते गुण दिसून आले हें त्यांनींच लिहून ठेवलें आहे. गांधीजी ' आत्मकथेंत ' लिहितात.

" ते आपला एक क्षणही फुकट जाऊं देत नसत. त्यांचें बोलणें-चालणेंही देशकार्यासाठीं असे. त्यांच्या वाणीमध्यें मला कोठेंही मलीनता, दंभ किंवा असत्य आढळलें नाहीं. " दीर्घोद्योग, देशभक्ति व नीतिसंपन्नता ह्या तीन गुणांनीं गोखल्यांनीं गांधीजींच्या हृदयांत अढळ स्थान मिळविलें. शिंवाय त्यांच्या वर्तनांतील प्रेमळपणाचें माधुर्य कांहीं विशेषच असे. गांधीजी कलकत्त्याहून काशीला निघाले, तर त्यांना पोचविण्यासाठीं गोखले स्वतः स्टेशनवर गेले, एवढेंच नव्हे तर लाडू-पुऱ्या ह्यांनीं भरलेला एक पितळी डबाही त्यांनीं त्यांच्याबरोबर दिला. ह्याहीपेक्षां अधिक प्रेम, अधिक साहाय्य गोखल्यांनीं गांधीजींना केलें तें म्हणजे खुद्द आफ्रिकेंत जाऊन.

तेथील सत्याग्रहाच्या समरांगणावर ता. २२ ऑक्टोबर १९१२ रोजीं ना. गोखले दाखल झाले. त्या वेळीं त्यांना हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्या दोन्ही ठिकाणीं मोठा मान होता. म्हणून आफ्रिकन सरकारनें व आफ्रिकेंतील गोऱ्या लोकांनींही त्यांचा टोलेजंग सत्कार केला. गांधीजींनीं तर त्यांची सर्व दृष्टींनीं शिष्य-शागिर्दीच पत्करिली. बॅरिस्टर झालेला हा गृहस्थ ह्या हिंदी मुत्सद्याच्या कपड्यांची इस्त्री स्वतः करीत असे. हजारों सत्याग्रह्यांच्या ह्या सेनापतीनें गोखल्यांचें दमलेलें शरीर स्वतः रगडण्याचीही तयारी दाखविली. गुरूनेंच नकार दिला म्हणून ते थांबले.

आफ्रिकेंतील शहराशहरांत गोखल्यांचें स्वागत व्हावें, सभा भराव्या, मेजवान्या वगैरे रूपानें सत्कार व्हावा, ह्यासाठीं गांधीजींनीं

खूप परिश्रम केले आणि ते पूर्णपणें यशस्वीही झाले. जोहान्सबर्ग येथें तर त्यांच्या गौरवाचा कळस झाला! स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उंची गालिचे पसरण्यांत आले होते. तेथें त्यांना जें मानपत्र देण्यांत आलें तें सोन्याच्या पत्र्यावर कोरलेलें होतें. त्या मानपत्राचा आकार हृदयासारखा होता. त्यावर हिंदुस्थानचा नकाशा व ताजमहाल कोरलेला होता. नगराध्यक्षांची मोटार गोखल्यांच्या तैनातीसाठीं होती. रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत जागून गोखल्यांनीं आपली बाजू खंबीरपणें तयार केली आणि ती गोऱ्यांच्या गळीं कुशलतेनें उतरविली. त्यांच्या वक्तृत्वाच्या पुंगीनें सारे गोरे गुंगून गेले. आफ्रिकन सरकारनें त्यांना हिंदी लोकांवरील अन्याय दूर करण्याचें वचन दिलें, तेव्हां गोखल्यांचें मन यशाच्या आनंदानें भरून गेलें. ते १७ नोव्हेंबर १९१२ रोजीं आफ्रिकेंतून परत निघाले.

हिंदुस्थानांत येतांच गोखल्यांपुढें अनेक मोठमोठीं कामें वाढून ठेवलेलीं होतीं. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या मदतीसाठीं तीन-चार लाख रुपये गोळा करून तर त्यांनीं पाठविलेच, पण त्याशिवाय हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या गळ्यांत ‘पब्लिक सर्व्हिस कमिशन’चें काम घातलें. हिंदुस्थानांतील वरिष्ठ सरकारी नोकऱ्यांची चौकशी करून सुधारणा करण्यासाठीं हें कमिशन नेमलेलें होतें. त्याचे गोखले सभासद झाले. त्याचा मेहेनताना दरमहा दोन हजार रुपये होता. तो गोखल्यांनीं नाकारला. कमिशनच्या कामासाठीं गोखल्यांना हिंदुस्थानांत व इंग्लंडांत खूप हिंडावें लागलें व अतिश्रम करावे लागले. १९१४ मध्यें इंग्लंडांत असतांना गोखले आजारी पडले. हें कळतांच गांधीजी त्यांना भेटण्यासाठीं आफ्रिकेंतून तिकडे गेले.

१३६

त्यांची गुरुभक्ति इतकी कीं इंग्लंडांतील थंडीचा कडाका असतांनाही, गोखल्यांच्या भेटीस जातांना गांधीजी पायांत कांहींही घालीत नसत. तें पाहून गोखल्यांनीं त्यांना बूट व मोजे घालण्यास सांगितलें. पुढें दोघेही पुण्यास आले. गांधीजींनीं आपल्या 'भारत सेवक समाजा'चें सभासद व्हावें अशी गोखल्यांची इच्छा, तीच गांधीजींचीही. पण तो योग कांहीं जमून आला नाहीं. तेव्हां गोखल्यांनीं त्यांना कानमंत्र दिला कीं "डोळे व कान उघडे आणि तोंड बंद ठेवून, सर्व देशभर हिंडून समाजस्थिति पाहा आणि मग येथील कार्याची योग्य वाटेल ती दिशा आंखा." तो गुरूपदेश मस्तकीं धारण करून गांधीजी निघून गेले.

गोखल्यांची प्रकृति जास्तजास्तच ढासळत चालली. मृत्यूची चाहूल त्यांना ऐकूं येऊं लागली. 'आतां हा देह राहाणार नाहीं.' असें ते म्हणूं लागले. ते नेहमीं सोसायटींतच राहात. तेंच त्यांचें घर. तेथें त्यांची आप्तमंडळी व मित्रमंडळी जमली. हरिभाऊ आपटे ह्यांना रात्रीं बोलावून आणलें. 'मला आतां आरामखुर्चीवर बसवा.' असें गोखले म्हणाले. खुर्चीवर बसून प्रसन्न मुद्रेनें ते बोलले, "ह्या लोकची मजा पाहिली, आतां तिकडची पाहूं." असें म्हणून त्यांनीं आकाशाकडे वर बोट केलें.

"हरिभाऊ, येतों आतां" असे शेवटचे उद्गार काढून, मान हलवून, गोपाळरावांनीं त्यांना नमस्कार केला व आपले डोळे शांतपणें मिटले. ता. १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं शुक्रवारीं रात्रीं अकरा वाजतां भारतमातेच्या कंठांतील हें तेजस्वी रत्न गळून पडलें.



डॉ. भांडारकर

हें वृत्त कळतांच सारा देश दुःखांत बुडाला. पुण्यांत मोठी प्रेतयात्रा निघाली. सिंहगडावरून टिळक धावून आले. स्मशान-भूमींत डॉ. भांडारकर व लो. टिळक ह्यांचीं भाषणें झालीं. पुढें केसरींत गोखल्यांविषयीं लिहितांना टिळकांनीं त्यांचे अलौकिक गुण समर्पक शब्दांनीं वर्णन केले आहेत. जन्मभर विरोध केलेल्या पण निःस्वार्थी देशभक्तीनें वागणाऱ्या गोखल्यांबद्दल टिळक लिहितात,

“ हत्ती, घोडे, संपत्ति, सत्ता किंवा अशाच प्रकारचीं दुसरीं बाह्य साधनें जवळ नसतां वयाच्या पन्नासाव्या वर्षापूर्वींच सर्व देशांत आपलें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं ठेवून जावें, हें कांहीं लहानसहान काम नव्हे. हें काम कोणासही आपल्या बुद्धिमत्तेनें, दीर्घोद्योगानें, सतत उच्च ध्येय मनापुढें ठेवून आपल्या कर्तबगारीनें करतां येतें हें गोपाळरावजींच्या चरित्रांतील मुख्य मर्म होय. ”

3832
...४८...
IRBK-0103832
IRBK-0103832